गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक ५२ वा ● सोमवार ०८ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 52 | Date : 08/07/2024 blow Monday, Page 4 Price 4

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती,वितरण,पारेषण कर्मचारी यांना मूळ वेतनात १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि., महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. आदींमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या मूळ वेतनात १९ टक्के व सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील वीज कंपन्यांच्या सहाय्यकांना परिविक्षाधीन कालावधीकरीता ५ हजारांची वाढ तर तांत्रिक कर्मचाऱ्यांचा भत्ता ५०० वरुन १००० इतका करण्यात आला असल्याचे, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेतन पुनर्निर्धारणासंदर्भातील बैठकीत सांगितले.सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या मर्यादित वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीचे आयोजन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री । पान २ वर





## आषाढी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू

### भाविकांना मिळणार सुलभ व जलद दर्शन : सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः दरवर्षी आषाढी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षी दिनांक ०७ जुलै रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला आहे. विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड; तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.

श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती आदी राजोपचार बंद होवून नित्यपुजा, महानैवेद्य व गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. दिनांक २६ जुलै (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध असणार आहे. श्रींचा पलंग । पान २ वर

## १३ जुलैपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळालं नाही तर, मनोज जरांगेंनी सांगितली पुढची योजना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

परभणी : येत्या १३ जुलैपर्यंत मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळवून द्यायचं आहे, तोवर कुणीही गाफील राहू नका, असा सल्ला मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला दिला आहे. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली आज परभणी येथे मराठा समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला जरांगे यांनी संबोधित केलं.



यावेळी ते म्हणाले, सरकारने आपल्याला १३ जुलैपर्यंत आरक्षण दिलं नाही तर आपण आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांना चोख प्रत्युत्तर देऊ. सरकारने आरक्षण दिलं नाही तर राज्यातील विधानसभेच्या सर्व २८८ मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार उभे करायचे की त्यांचे २८८ उमेदवार पाडायचे याचा निर्णय लवकरच घेऊ.

मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला उद्देशून म्हणाले, गाफील राहू नका, हा माझा नेता, तो तुझा नेता असा वाद घालत बसू नका. आपण इतकी वर्षे आपल्या नेत्यांना मोठे करत आलो आहोत. आता आपल्या मुलांना कसं मोठं करता येईल ते पाहा. अनेकांनी आपल्या मुलांना मरताना पाहिलं आहे. आरक्षण नसल्यामुळे खचलेलं पाहिलं आहे. परंतु, आता आपली लेकरं मोठी करायची आहेत आणि आपल्या लेकरांना मोठं करण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळवून द्यायचं आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय आपण थांबायचं नाही.

मराठा आंदोलक जरांगे पाटील म्हणाले, मी सर्वांना शेवटचं सांगतो, संपूर्ण ताकदीने एकत्र राहा. आपली शक्ती कमी पडू देऊ नका. या सरकारने आपल्याला आरक्षण दिलं । पान २ वर

## हन्नूर नळदुर्ग रस्ता बनला अपघाताचा सापळा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/ गौतम बाळशकरः हन्नूर नळदुर्ग रस्ता अक्कलकोट ला जाणारा हा दोन पदरी असुन रस्ता चार ते पाच वर्षा पूर्वी झाला असून या रस्त्याच्या मध्ये भागी मोठी भेग पडलेली आहे या भेगेत मोटारसायकल चे चाक सहज जाऊ शकते व अपघात होऊन जीव जाऊ शकतो हन्नुर ब-हाणपुरच्या मधोमध लेंडी येथील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून. मोटरसायकल सुद्धा जाणे कठीण आहे. पावसात जाणे अत्यंत जीव घेणे झाले आहे. तसेच चपळगाव बावकरवाडी यामधील मधला रस्ता फुला जवळचा चिखलाचा सापळा झाला आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात हा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वामी समर्थ कारखान्यापासून मधला रस्ता खूपच खराब झाला आहे. कच्चा सिमेंट रोड असून. सिमेंट रोड मध्ये खड्डे पडले आहेत. प्रवाशांना अनेक यातना सामोरे जावे लागत आहे. संबंधित अधिकारी व या रोडचे ठेकेदारांनी लक्ष घालून लवकरात लवकर या संदर्भातील काम करावे अन्यथा खड्डे तरी बुजून घ्यावे. अशी मागणी प्रवाशाच्या माध्यमातून होत आहे.



## विशाळगड अतिक्रमणावरून संभाजीराजे आक्रमक; १३ जुलैला शिवभक्तांसह गडावर देणार धडक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कोल्हापूर : किल्ले विशाळगडवर झालेलं अतिक्रमण काढणं हेच मोठ संकट आहे. १३ जुलै रोजी माझ्यासकट सर्व शिवभक्त विशाळगडावर जाणार आहेत, आता त्यांना कोणीच थांबवू शकत नाही. आम्हाला पोलिसांची भीती दाखवाल, पण आम्ही घाबरणार नाही अशा शब्दात संभाजी राजे छत्रपती निर्धार व्यक्त केला आहे. गेल्या काही दिवसांपासून विशाळगडावरील अतिक्रमणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. त्या पार्श्र्वभूमीवर आज संभाजीराजे यांनी भूमिका स्पष्ट करताना १३ जुलै रोजी चलो विशाळगडचा नारा दिला. आता गप्प बसून चालणार नाही, कुठेतरी भूमिका घेतलीच पाहिजे असं त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, अन्यायाविरोधात उभे राहणे हीच माझी भूमिका असल्याचे संभाजी राजे म्हणाले. अतिक्रमण काढून टाकावे हीच एकच मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राजसदरेवरून संभाजी राजे तुमच्या मनातील विशाळगड आहे तोच आमच्या मनातील आहे सांगितले होते. आता आम्हाला मुख्यमंत्र्यांच्या मनातील बघायचं असल्याचे संभाजी राजे म्हणाले. त्यामुळे १३ जुलै रोजी दुपारी बारा वाजता चलो विशाळगडचा नारा दिल्याचे ते म्हणाले.



संभाजी राजे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन पुढे जाता आलं पाहिजे. आज ती वेळ आली आहे. विशाळगडला खूप मोठा इतिहास असून त्यामुळे विशाळगडला मी जाण्याचा निर्णय घेतला. त्या ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे एकूण येतो. दीड वर्षांपूर्वी गडावर । पान २ वर

## माझी लाडकी बहिण योजनेचे ऑनलाईन अर्ज भरताना शुल्क आकारणाऱ्या २ नेट कॅफे विरोधात गुन्हे दाखल

### या योजनेतील महिला लाभार्थ्यांचे अर्ज भरण्यास जिल्ह्यातील कोणत्याही महा-ई-सेवा केंद्र व नेट कॅफे यांनी शुल्क घेऊ नये : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**✻ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व उत्तरचे प्रांताधिकारी सदाशिव पडदूने यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सारिका वाव्हाळ यांनी केले गुन्हे दाखल ✻ जिल्ह्यातील प्रत्येक महा-ई-सेवा केंद्र व नेट कॅफेवर प्रशासनाचे बारीक लक्ष आहे**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य शासन मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना ही अत्यंत महत्त्वकांक्षी योजना राज्यात सर्वत्र राबवत आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना प्रति महिना १५०० रुपये शासन देणार असून यासाठी प्रतिवर्षी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद राज्य शासनाच्या वतीने करण्यात आलेली आहे. या योजनेचे ऑनलाईन अर्ज भरत असताना महा-ई-सेवा केंद्र अथवा नेट कॅफे यांनी कोणतेही शुल्क न आकारता मोफत अर्ज भरून महिला लाभार्थ्यांना सहकार्य करण्याबाबत शासन निर्णयावे निर्देशित केलेले आहे. शासन संबंधित सेवा केंद्राला प्रति अर्ज पन्नास रुपये शुल्क देणार आहे.

तरी सात रस्ता परिसरातील दोन नेट कॅफे चालकांनी अशा लाभार्थी महिलाकडून शंभर रुपये व दोनशे रुपये शुल्क आकारल्याप्रकरणी संबंधित नेट कॅफे चालकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील कोणत्याही महा ई केंद्रावर व नेट कॅफेवर या योजनेचे अर्ज भरण्यास संबंधित महिला लाभार्थ्यांकडून कोणतेही शुल्क घेऊ नये, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.




सात रस्ता परिसरातील प्रगती नीट कॅफे व योगेश्र्वर नेट कॅफेमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरणाऱ्या महिलांकडून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी १०० रुपये व २०० रुपये घेऊन अर्ज भरण्यासाठी शंभर ते तीनशे रुपये आकारले जात असल्याची माहिती गुप्तवार्ता विभागाकडून सोलापूर उत्तरचे प्रांत अधिकारी सदाशिव पडणे यांना मिळाली. त्यानंतर प्रांताधिकारी श्री पडदूणे यांनी उत्तर तहसिलदार यांना संबंधित नेट कॅफे कारवाई करण्याबाबत । पान २ वर

## दुधनीच्या मुख्याधिकाऱ्यांनी २४ लाखांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप

### मुख्याधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारविरोधात सातत्याने ग्रामस्थांच्या तक्रारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अग्निशामक दलाची सेवा कागदपत्रे दाखवून गेल्या दोन वर्षांपासून जवळपास २४ लाखांचा भ्रष्टाचार मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांनी केल्याचा आरोप दुधनी काँग्रेसचे अध्यक्ष गुरुशांत ढंगे व सेवादलचे अध्यक्ष शशिकांत सावळसुर यांनी केला आहे.

अनेक दिवसांपासून तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांच्या विरोधात सातत्याने तक्रारी होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक घोटाळे, जनतेच्या मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यात आलेले अपयश, कामातील नाकर्तेपणा व सर्वसामान्यांसोबत वागण्याची चुकीची पद्धत यामुळे जनतेत दिवसेंदिवस रोष वाढत चालला असल्याचे शशिकांत सावळसुर यांनी सांगितले.१४ डिसेंबर २०२२ रोजी नगरपालिका निधीतुन अग्निशामन दलाच्या कामकाजासाठी तब्बल २४ लाख ५१ हजार चारशे रुपयांच्या कामांसाठी मंजूरी देऊन वर्क ऑर्डरदेखील देण्यात आले होते.जेणेकरून दुधनी व भागातील घडणाऱ्या अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी हा निधी राखीव ठेवण्यात आला होता.परंतु प्रशासकराज असल्याचा गैरफायदा घेत वाळुंज यांनी यामध्ये मोठा भ्रष्टाचार केला आहे.विशेषतः अग्निशामन दलाच्या गाडीला अद्यापही आरटीओ पासिंग मिळाला नाही.या गाडीवर फायरमॅन,ऑफिसर असे कर्मचारी देखील नेमले नाहीत. ही गाडी बंद अवस्थेत आहे.गेल्या काही दिवसांपासून दुधनी भागात तीन-चार वेळा आग लागलेली असतानादेखील या सेवेचा लाभ ग्रामस्थांना देण्यात । पान २ वर



### माझ्यावरील आरोप बिनबुडाचे-मुख्याधिकारी अतिश वाळुंज

अग्निशामन दलासंदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराच्या बाबतीत माझ्यावर केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. आरोप करणाऱ्यांनी समक्ष विचारणा केल्यास लेखी स्वरूपात उत्तर देण्यासाठी तयार आहे.सर्व कायदेशीर प्रक्रिया अवलंबून अग्निशमन दलाचे साहित्य खरेदी केले असून अत्यंत पारदर्शकपणे निधी खर्च केलेले आहे.

## संपादकीय

### सरकारवर घणाघाती आरोप..

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सभागृहातील आपल्या भाषणादरम्यान महायुती सरकारवर घणाघाती आरोप केले. हे आरोप करताना वडेट्टीवार यांनी घातलेली आर्त साद सगळ्यांच्याच जिव्हारी लागली, ती म्हणजे मुंबईला 'अदानीं'पासून वाचवा. अदानी पूर्ण मुंबई साफ करीत असताना राज्याचे प्रमुख अदानींना पाठीशी घालत आहेत, असा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार यांनी विधानसभेत मुंबईतील जमिनी हस्तांतरणाचा मुद्दा उपस्थित केला, त्यावेळी ते बोलत होते. कुर्ला येथील दुधशाळेची सुमारे वीस हजार कोटी रुपये मूल्य असलेली साडेआठ हेक्टर जमीन आहे. ही जमीन १० जून २०२४ रोजी एकाच दिवशी पशुसंवर्धन विभाग व महसूल विभागाकडून अदानी यांना हस्तांतरित करण्यात आली. हे हस्तांतरण अवघ्या एकाच दिवसात झाले. इतकी तत्परता कशी, असा सवाल त्यांनी केला. या जमिनीच्या हस्तांतरणासंदर्भात तत्कालीन पशुसंवर्धन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी काय शिफारशी केल्या होत्या. मुंढे यांनी दिलेली नोट अनुकूल नसल्यानेच त्यांची बदली करण्यात आली का, असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. महायुती सरकारने सभागृहाला याबाबतची माहिती देण्याची मागणी त्यांनी केली. वडेट्टीवार यांनी केलेला आरोप अतिशय गंभीर आहे. सद्य:स्थितीत मुंबईत एखाद्या घराचा मालकी हक्क बदलायचा झाला तरी त्यासाठी कित्येक कागदपत्रे बनवावी लागतात. स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. तिथेही अधिकारी दाद देत नसल्याने दलालांना मध्यस्थी घालावे लागते. चिरीमिरीपासून चहापाणीपर्यंत सगळे खर्च करावे लागतात. तेव्हा कुठे काम होते. अशा वेळी अदानी हे महायुती सरकारचे जावई असल्याप्रमाणे राज्य सरकारच्या मालकीची म्हणजेच मुंबईकरांची जमीन त्यांच्या घशात घातली जात असेल, तीदेखील कवडीमोल दरात तर प्रश्न उपस्थित व्हायलाच पाहिजे. आज मुंबईतील उद्योगधंदे, शहराच्या आर्थिक नाड्या या आधीपासूनच परप्रांतीयांच्या हाती होत्या. परंतु, मराठी माणूस मुंबईतील जमिनी ताब्यात ठेवूनच आपले अस्तित्व राखून होता. याच जागा आता त्याच्या हातातून हिसकावून घेतल्या जात आहेत.

# महाराष्ट्राला 'मार्वल' च्या माध्यमातून मिळणार आता कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा एआय हा सध्या तंत्रज्ञानातील सर्वात लोकप्रिय शब्दांपैकी एक झाला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने केला तर मानवाचे जीवन सुकर होऊ शकते. याच उद्देशाने आता जगभर विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्र पोलीस दलालाही आता 'मार्वल' कंपनीच्या स्थापनेमुळे गुन्ह्यांची उकल गतीने करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाली असून भविष्यात सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी महाराष्ट्राला याचा मोठा लाभ मिळणार आहे.मागील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून अनेक नवकल्पना निर्मित होऊन प्रगती साधली जात आहे. अनेक वर्षांपूर्वी ज्या बाबी कल्पनेबाहेरच्या वाटत होत्या त्या वैज्ञानिक सिद्धांताद्वारे मान्य होऊन हळूहळू वास्तविकतेत रूपांतरित झाल्या. त्याचेच आजचे आधुनिक स्वरूप म्हणून आपण कृत्रिम बुद्धीमत्तेकडे पाहू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवाप्रमाणे विचार करण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी तयार केलेल्या संगणकामधील मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण म्हणता येईल. शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे, समज आणि भाषेचे आकलन ही सर्व या संगणकीय क्षमतांची उदाहरणे म्हणता येतील. संगणक, संगणक-नियंत्रित रोबोट किंवा सॉफ्टवेअर बनवण्याची एक पद्धत आहे जी मानवी मन आणि बुद्धिप्रमाणे विचार करते. मानवी मेंदूचा अभ्यास करून आणि माहितीचे विश्लेषण करून त्याचे परिणाम दर्शविते.

वास्तववादी आणि उच्च गुणवत्तेच्या प्रतिमा, व्हिडीओ आणि ऑडिओ तयार करण्यासाठी सुमारे एक दशकापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भारतात होऊ लागला. त्यासोबतच गुगल एआय, चॅट-जीपीटी आदी माध्यमातूनही याचा वापर वाढू लागला आहे. त्याचप्रमाणे सिरी किंवा अलेक्सा ही नावे सुद्धा परिचित झाली आहेत. या मशीन्स सुद्धा मर्यादित स्वरूपात कृत्रिम बुद्धिमत्तेचा भाग म्हणता येतील. मानवाप्रमाणे विचार करण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सिद्ध होऊ लागली आहे. सध्या चॅटबॉट्सने जगात वादळ आणले आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात डेटाचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले आहे. मोठमोठ्या कंपन्या दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि कामगारांना मदत करण्यासाठी याची मदत घेत आहेत. मानवी आकलनशक्ती आणि तर्कावर आधारित निर्णय घेण्याच्या क्षमतेच्या जोरावर जटील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाऊ लागला आहे. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस दलाला याचा मोठा लाभ होऊ शकणार आहे.

सद्यस्थितीत शासनाच्या विविध विभागांकडे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असते. पोलीस दलाकडे गुन्हे आणि गुन्हेगारांसंबंधी माहिती मोठ्या प्रमाणावर येत असते. सायबर आणि आर्थिक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या संख्येतही मोठी वाढ होत असून नागरिकांच्या फसवणुकीचे नवनवीन मार्ग अवलंबिले जात आहेत. यात गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्हेगारांची संख्या देखील मोठी असते. प्रत्येक बाबीत विविध प्रकारे मानवी मेंदूच्या क्षमतेचा वापर करून आणि उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून गुन्ह्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि या माहितीचा वापर करून विश्लेषण करायला आणि मनुष्याप्रमाणे निर्णय घ्यायला आधुनिक संगणकालाच शिकविले तर याचा मोठा लाभ होऊ शकतो. हाच धागा पकडून महाराष्ट्र पोलीस दलात एआयचा वापर करण्यासाठी स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करून पोलीस दलाला या कृत्रिम बुद्धीमत्तेची मदत मिळवून देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने १६ मार्च २०२४ च्या बैठकीत घेतला आणि त्या अनुषंगाने तातडीने पावले उचलून 'मार्वल' कंपनीची स्थापना करण्यात आली.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन गुप्तवार्ता क्षमता भक्कम करण्यासाठी आणि अपराधांचा पूर्वानुमान लावण्याची क्षमता वाढविण्यासाठी तसेच राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी राज्यात 'चरहरीहींीर ढ्शीशरीलह रपव तळशळश्ररपलश षी एपहरपलशव डु एपषेीलशशापी (च-ठ्तएड)' 'मार्वल' ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे. कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अशा प्रकारचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कंपनीस शासनामार्फत ४ कोटी २० लाख रुपये प्रतीवर्ष याप्रमाणे पाच वर्षांकरिता १०० टक्के भागभांडवल देण्यात येणार असून भागभांडवलाचा पहिला हप्ता नुकताच वितरीत करण्यात आला आहे.

'मार्वल' स्थापन करण्याबाबत राज्य शासन, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर आणि मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. यांच्यात दि.२२ मार्च २०२४ रोजी त्रिपक्षीय करार करण्यात येऊन शासनाची ही कंपनी अधिनियम २०१३ खाली नोंदणीकृत करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्यासमोर पोलीस जिमखाना येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत राज्याच्या मुख्य सचिव तथा गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक (अतिरिक्त कार्यभार), पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याबाबतचे सादरीकरण करण्यात आले.

पोलीस दलाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्याने मशीनला माहितीचे विश्लेषण करून आणि मानवाप्रमाणे विचार करायला शिकवून गुन्ह्यांची उकल करण्यासाठी तसेच होणारे गुन्हे रोखण्यासाठी मोठा लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर गुन्हेगारांची गुन्हे करण्याची पद्धत जाणून, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून कुठे गुन्हा घडू शकतो, कुठे कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते आदी बाबींचे अनुमान आधीच लावता येऊ शकणार आहे.

या उपक्रमातील मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. ही चेन्नई स्थित कंपनी असून त्यांना भारतीय नौदल, गुप्तवार्ता विभाग, आंध्र प्रदेश, आयकर विभाग, सेबी आदी संस्थांना एआय सोल्युशन्स पुरविण्याचा अनुभव आहे. त्याचबरोबर नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या विशेषज्ञतेचा उपयोग व्हावा या उद्देशाने 'मार्वल' चे कार्यालय नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या आवारात आहे. पोलीस दलाच्या मागणीनुसार 'पिनाका' एआय सोल्युशन्स पुरवेल तर, भारतीय व्यवस्थापन संस्था संशोधन आणि प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणार आहे. नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर चे संचालक हे या कंपनीचे पदसिद्ध संचालक असतील आणि मे.पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या.चे संचालक हे या कंपनीच्या संचालक मंडळावर असणार आहेत. तर नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक हे पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी असतील.

देशात नावलौकिक असणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाची कार्यक्षमता कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापरामुळे आणखी वाढणार असून सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची उकल तातडीने होण्यासाठी हातभार लागेल, यात शंका नाही. 'मार्वल' थेट शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणार आहे. त्यामुळे भविष्यात शासनाच्या इतर विभागांनाही कृत्रिम बुद्धीमत्तेचा लाभ मिळून महाराष्ट्र आणि पर्यायाने भारत देश विविध क्षेत्रात जगभरात अग्रेसर राहील, हे निश्चित.

**-ब्रिजकिशोर झंवर,**
**वरिष्ठ सहायक संचालक,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

पान १ वरुन

### आषाढी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल

काढताना पुजेवेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, विभाग प्रमुख संजय कोकीळ, अतुल बक्षी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.याशिवाय, दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, प्रिंफ्रेकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर वाटप करण्यात येत आहे. दर्शन रांगेतील भाविकांची गर्दी लक्षात घेता दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालवून भाविकांना जलद व सुलभ दर्शन देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

### विशाळगड अतिक्रमणावरून ..

गेल्यानंतर सगळी दृश्य पाहिल्यानंतर मला खूप दुःख झाल्याचे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, मी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांना भेटलो होतो आणि अतिक्रमण झाल्याचे सांगितले होते. अतिक्रमण हटवण्याची मागणी केली होती. दोन्ही बाजूनी अतिक्रमण झाल्याचे संभाजीराजे यांनी सांगितलं. आम्ही धर्माच्या विरोधात नाही. शिवाजी महाराजांच्या किल्ला असताना मद्यपान केलं जातं. कत्तलखाने बंद करावेत, अशी आम्ही मागणी केली होती. या सर्व मागण्यांच्या पार्श्वभूमीवर महाशिवरात्रीपूर्वी अतिक्रमणे काढली जातील, असे आश्वासन देण्यात आलं आणि काम चालू झालं होतं. मात्र, तातडीने त्याला न्यायालयातून स्थगिती देण्यात आली. त्यामुळे अतिक्रमण काढण्याची मोहीम बंद करण्यात आली.

शिवभक्त राजे तुम्ही भूमिका का घेत नाही अशी प्रश्न विचारू लागले होते. त्यामुळे पुन्हा चळवळ सुरू होत आहे. दोन्ही बाजूने झालेल्या आक्रमण काढावे हीच माझी मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले. दीड वर्षांपूर्वी स्थगिती झाल्यानंतर सरकारने काय केले याचे उत्तर द्यावच लागेल, आता गप्प बसून चालणार नाही. भूमिका घ्यावी लागेल असे त्यांनी स्पष्ट केले

### माझी लाडकी बहिण योजनेचे

सूचित करण्यात आले. तहसीलदार यांनी मंडळ अधिकारी सारिका कल्याण वाव्हळ यांना संबंधित नेट कॅफे वर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्यास शुल्क आकारले जात असल्याची खात्री करून गुन्हे दाखल करण्याविषयी निर्देशित करण्यात आले.

उपरोक्त दोन्ही नेट कॅफे मध्ये या योजनेसाठी महिला लाभार्थ्याकडून अर्ज भरण्यासाठी शुल्क आकारले गेले याची खात्री झाल्यानंतर उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाच्या मंडलाधिकारी सारिका कल्याण वाव्हळ यांनी सदर बझार पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे. ते दोन्ही नेट कॅफे अधिकृत ई महा सेवा केंद्र नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी दोन्ही नेट चालकाविरुद्ध भा न्या सं ३१८(२),३१८(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

### दुधनीच्या मुख्याधिकाऱ्यांनी २४

नगरपालिका अपयशी ठरली आहे.असे वास्तव असतानाही एस.पी एंटरप्राइजेस, सोलापूर यांच्या नावे बोगस बिले काढत भ्रष्टाचार केलाचा आरोप सावळसुर व ढंगे यांनी केला आहे. दुधनीच्या १४ माजी नगरसेवकांनी सातत्याने तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊनदेखील अद्यापही कार्यवाही का करण्यात आली नाही,असा सवाल देखील यावेळी उपस्थित करण्यात आला.

### १३ जुलैपर्यंत मराठा समाजाला

नाही तर आपण महाराष्ट्रातील मराठा समाजाची सर्वात मोठी बैठक आयोजित करू. एका विशाल मैदानावर ही बैठक घेऊ आणि या बैठकीत आपण पुढचं नियोजन करू. या सरकारने आपल्याला आरक्षण दिलं नाही तर काय करायचं याचा निर्णय त्या बैठकीत घेऊ. २८८ मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार उभे करायचे की त्यांचे २८८ उमेदवार पाडायचे त्याचा निर्णय त्या बैठकीत घेतला जाईल. मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा समाजातील लोकांना १०० टक्के मतदान करण्याचं आवाहनही केलं. पाटील म्हणाले, आपली एकजूट आता सर्वांनी पाहिली आहे. ही एकजूट कायम ठेवा. आपली एकजूट पाहून काही जण शहाणे झाले आहेत. ते आता आपल्यासारखे वागू लागले आहेत. परंतु, आपण आपला विषय मागे पडू द्यायचा नाही. मला अपेक्षा आहे की हे सरकार येत्या १३ जुलैपर्यंत आपल्याला आरक्षण देईल आणि नाही दिलं तर यांचे २८८ आमदार पडलेच म्हणून समजा.

### महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती

देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या बैठकीस ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार या तिन्ही कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, तसेच संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने प्रकल्पग्रस्तांना पूनर्वसन पॅकेज

## २३ लाभार्थ्यांना २ कोटी ७३ लाखांचे धनादेश वाटप



चंद्रपूर : भद्रावती तालुक्यातील कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड या खुल्या कोळसा खाणीमुळे बरांज मोकासा, चेक बरांज, तांडा आणि पिपरबोडी गावांचा गत १५ वर्षांपासून रखडलेला पुनर्वसनाचा प्रश्न राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने निकाली निघाला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून ३२८ कुटुंबांना ४० कोटींचे पुनर्वसन पॅकेज जाहीर झाले आहे. या अंतर्गत शुक्रवारी नियोजन भवन येथे २३ लाभार्थ्यांना २ कोटी ७३ लाखांचे धनादेश वाटप पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अपर पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, महानगर पालिका आयुक्त विपीन पालीवाल, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार (भुसंपादन), अतुल जटाळे (पुनर्वसन), डॉ. मंगेश गुलवाडे, देवराव भोंगळे, नरेंद्र जीवतोडे, रमेश राजुरकर, बरांज मोकासाच्या सरपंचा मनिषा ठेंगणे, प्रवीण ठेंगणे आदी उपस्थित होते.

कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड ही कोळखा खाण सन २०१५ ते २०२१ या कालावधीत बंद होती. खाण सुरू झाल्यानंतर कंपनीने प्रकल्पग्रस्तांना कोणताही मोबदला दिला नाही. प्रकल्पग्रस्त कुटुंबांना बंद काळातील पुनर्वसन पॅकेज मिळवून देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला. या संदर्भात त्यांनी थेट केंद्रीय कोळखा मंत्री श्री. रेड्डी यांची दिल्ली येथे भेट घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मांडल्या. अखेर बरांज मोकासा, तांडा आणि चेकबरांज, पिपरबोडी येथील ३२८ कुटुंबांना ४० कोटींचे पुनर्वसन पॅकेज जाहीर झाले.

यावेळी बोलतांना पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, मी कायम प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केंद्रीय कोळसा मंत्री किशन रेड्डी यांना चंद्रपूरात आणून नागरिकांच्या अडचणी सोडविण्यात येतील. ज्यांना पुनर्वसन पॅकेज अंतर्गत धनादेश मिळाले त्यांनी हे पैसे सुरक्षित ठेवावे. उर्वरीत नागरिकांनासुध्दा धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे. कोणीही पुनर्वसन पॅकेजपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाहीसुध्दा पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिली.

या लाभार्थ्यांना मिळाले पुनर्वसन पॅकेज : बरांज मोकासा येथील श्यामराव बालपणे, दौलत बालपणे, सुधाकर बालपणे, दादाजी निखाडे, ताराबाई पालकर, बबन सालुरकर, एकनाथ तुळनकर, अशोक पुनवटकर, मायाबाई देवगडे, सुशीला डहाके, शंकर काथवटे यांना, चेकबरांज येथील सुर्यभान ढोंगे, सुमन ढोंगे, संजय ढोंगे, लक्ष्मण कोवे, नीळकंठ मेश्राम यांना तर नोकरीच्या ऐवजी एकरकमी मोबदला म्हणून देवराव परचाके, भाऊराव परचाके, विश्वनाथ जिवतोडे, काशिनाथ जिवतोडे, शशिकला चालमुरे, परसराम घाटे, हनुमान भोयर या सर्वांना एकूण २ कोटी ७३ लक्ष रुपयांचे धनादेश वाटप करण्यात आले.

मुख्यमंत्री सहायता निधीचे वाटप : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते स्वाती हर्षल पारखी आणि लता बाळू गेडाम यांना मुख्यमंत्री सहायता निधीचा प्रत्येकी १ लक्ष रुपयांचा धनादेश वाटप करण्यात आला.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# एका पावसाच्या दणक्याने उडवला मध्य रेल्वेचा बोजवरा, शहापूरमध्ये पूर,तर मध्य रेल्वे ची रेल्वे सेवा सहा ते सात तास विस्कळीत


**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे : शनिवारी (दि. ६जुलै )मध्य रात्री पासून पडत असलेल्या मुसळधार पावसाच्या दणक्याने ठाणे जिल्हा, शहापूर तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाल्याचे पहायला मिळालं.. रेल्वे ची कल्याण कसारा सेवा तब्बल सहा ते सात बंद होती.. आपत्ती व्यवस्थापन अशा ठिकाणी नापास झाल्या चे चित्र दिसून येत असल्याची भावना कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घनघाव यांनी व्यक्त केलीये.. पावसाच्या दणक्याने वाशिंद, खडवली आणि आटगाव दरम्यान रेल्वे ट्रॅकखालील माती वाहून गेल्या चे दिसून आलं आहे.

शनिवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील लोकल सेवा विस्कळीत झाली आहे. रविवारी पहाटेच्या सुमारास आटगाव रेल्वे स्थानकाजवळ झाडे कोसळल्याने तसेच काही ठिकाणी रेल्वे रुळाखालील माती वाहून गेल्याने कल्याणहून कसाऱ्याकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात आली होती .मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याणहून कसारा दिशेने जाणारी रेल्वे सेवा सकाळी सात पासून विस्कळीत झाली होती . मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी रेल्वे रुळावर पाणी साचले होते . झाडंदेखील कोसळली होती . याशिवाय वासिंद रेल्वे स्थानकाजवळ ओव्हरहेड वायरचा पोल खचल्याने वीज पुरवठा देखील बंद झाला होता . त्यामुळे वासिंद-कसाऱ्याकडे जाणारी रेल्वे वाहतूकदेखील ठप्प झाली होती .कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने शहापूर डेपो मॅनेजर यांना विनंती नुसार आटगाव येथून कल्याण पर्यंत जाण्यासाठी ड.ढ.बसेस सोडण्यात आल्या होत्या. ..

महत्त्वाचे म्हणजे, रविवारी विशेष मेगाब्लॉक रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात येतो. मात्र मध्य रेल्वे विस्कळीत झाल्याने मेगा ब्लॉकदेखील रद्द करण्यात आला होता . रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने कल्याणच्या पुढे शहाड, अंबिवली, टिटवाळापासून कसारापर्यंत सर्वच रेल्वे स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती .

दरम्यान, कल्याण-कसारा मार्गावरील रेल्वे सेवा लवकरात लवकर सुरु व्हावी, यासाठी प्रयत्न सुरू असून प्रवाशांनी याची नोंद घ्यावी, अशी माहिती मध्य रेल्वेच्या अधिकारी अधून मधून देत होते. रेल्वे सेवा बंद मुळे रेल्वे प्रवाशी मात्र वैतागले होते... मुंबई हुन उत्तरे कडील लांब पल्ल्याची रेल्वे सेवा दिवसभर बाधित झाली होती... तर लोकल सेवा ही दुपारी दोन नंतर हळूहळू पूर्व पदावर येऊ लागल्याचे दिसत होते. या सर्वात रेल्वे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा दिसून आली नाही असा गंभीर आरोप रेल्वे प्रवासी संघटनेचे राजेश घनघाव यांनी केला आहे.



शनिवारी /रविवार च्या पावसाने शहापूर शहरातील भारंगी नदीला आलेल्या पुराने गुजराती बाग, रामबाग, चिंतामणी नगर परिसरात लोकांना पुराच्या पाण्याची फटका बसला असून इमारती च्या तळमजला पाण्याखाली गेल्याचे दिसून येत होते.. यातच पुराच्या पाण्यात नागरिकांच्या चारचाकी आणि दुचाकी वाहने काही प्रमाणात वाहून गेले तर अनेक वाहने पाण्याखाली गेली. शहापूर शहरातील गुजराती बाग परिसरातील नागरिक प्रशासनाच्या विरोधात रस्त्यावर उतरले होते व आसनगाव कडे जाणाऱ्या रस्त्यावर नागरिकांनी धरणे आंदोलन केले.यावेळी आमदार दौलत दरोडा यांनी घटनास्थळी भेट देऊन सर्व नुकसानग्रस्त नागरिकांच्या घरात जाऊन पाहणी केली व जिल्हाधिकारी , प्रांत तसेच तहसीलदार व संबंधित तलाठी व प्रशासनास यावर ठोस उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना देऊन नागरिकांना पाठींबा दिला व भारंगी नदीपात्रात बांधकाम करण्यासाठी परवानगी दिलेल्या प्रशासनावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. एकंदरीत पावसाच्या दणक्याने जनजीवन विस्कळीत झाल्या चे पाहायला मिळालं.

# विद्यार्थी दशेतच नाव लौकिक करण्याची जिद्द असते...

## सिध्दार्थ गायकवाड यांचे प्रतिपादन : निवासी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांचा सत्कार



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

गोदिंयाः आजचा विद्यार्थी हा काही तरी करण्याची धडपड मनात निर्माण करत असतो. आमच्या सानिध्यात राहणारा विद्यार्थी हा नेहमी आपला प्रयत्न करुन जीवन जगत असतो. निवासी शाळेत व वसतिगृहात राहुन अनेक विद्यार्थी आपले भविष्य घडवत असतात. याचे प्रतिबिंब म्हणून हे पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा पात्र झालेले विद्यार्थी आहेत. म्हणूनच विद्यार्थी दशेतच नाव लौकिक करण्याची जिद्द असते. असे प्रतिपादन समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त डॉ सिद्धार्थ गायकवाड यांनी केले. ते पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा सत्कार कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मंचावर डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी म्हणून समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विनोद मोहतूरे, शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, प्रभारी गृहपाल प्रदिप ढवळे आदी मंचावर उपस्थित होते.याप्रसंगी सहाय्यक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या मार्गदर्शनात लेझीम पथकाने लेझीम सादरीकरण करुन मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. शालेय परिसरात डॉ. सिध्दार्थ गायकवाड व विनोद मोहतूरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नंतर प्रवेशोत्सव सेल्फी स्टन्डवर स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रम हा अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा मुर्री येथे दुपारी १२.१५ वाजता आयोजित करण्यात आला होता. अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा मुर्री शाळेतील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवी या परिक्षेत संपूर्ण महाराष्ट्रात या शाळेने बाजी मारली आहे. तब्बल एकुण आठ विद्यार्थी पात्र झाले असून सदर विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती शासनाकडून मिळणार आहे. विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याकडून अनेकांनी प्रेरणा आणि अनुभव घ्यावे असे ही सिध्दार्थ गायकवाड यांनी सांगितले. कार्यक्रम संचालन अस्मिता तेलंग यांनी करुन आभार साधना पारधी यांनी मानले. तर कार्यक्रम यशस्वितेसाठी सहाय्यक शिक्षक नीता भलमे, मुन्नाभाई नंदागवळी, शाळेतील सर्व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेऊन यशस्वी केले.

# नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल लोखंडे सन्मानित

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल लोखंडे यांना सर्वोत्कृष्ट मिसींग निर्गती उत्कृष्ट दोषसिध्दी पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन धाराशिव जिल्हा




पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते नुकतेच गौरविण्यात आले.

खाकी वर्दीत देखील शेवटी माणूस असतो आणि वर्दीसी इमान राखून इमानी इतबारे आपले कर्तव्य पार पाडत असतो.जनतेची सुरक्षा करण्यासाठी कधीही तत्पर असणारे पोलीस कर्मचारी. कधी कधी तर स्वतःच्या जीवाची पर्वा न करता स्वतःला संकटात झोकुन देणारे,आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणारे अनेक पोलीस अधिकारी आहेत.त्यात नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल लोखंडे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.एक कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी म्हणून आपली ओळख निर्माण करणारे सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्निल लोखंडे यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मिसींग प्रकरणाचा तात्काळ शोध घेऊन जास्तीत जास्त मिसींगची निर्गती करून संपूर्ण जिल्ह्यामध्ये सर्वोत्तम कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांना सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी शुभेच्छा देताना अतुल कुलकर्णी म्हणाले की आपले व आपल्या सहकार्याचे हार्दिक अभिनंदन...!! आपण भविष्यातही अशीच कामगिरी कराल अशी अशा बाळगतो.यावेळी पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध धंदे यांना आळा घालण्यासाठी जाणिव पुर्वक प्रयत्न केला या बद्दल त्यांना सदर पुरस्कार मिळाल्याने सर्वसामान्य नागरिकांतून त्यांच्या वर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# गायरानावरील घरे तोडू नका : ॲड.प्रकाश आंबेडकर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमी संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शुक्रवारी भेट घेतली. या भेटीत वंचित बहुजन आघाडीच्यावतीने प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या. गायरानावरील घरांवर कारवाई करू नये, अशी मागणी करण्यात आली. त्याबाबत लवकरच धोरणात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्र्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीला दिले आहे, अशी माहिती वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

वंचितने केलेल्या मागण्या...

१. शासकीय अतिक्रमण जमीनधारकांच्या पिकाला संरक्षण देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. त्या संदर्भातील निर्णय काढण्याचा आदेश त्यांनी ताबडतोब सचिवांना दिला.

२. महाराष्ट्रभर ग्रामीण भागात कुटुंब वाढल्यामुळे एका कुटुंबाची चार घरं झाली आहेत. जी नवीन घरं आहेत, त्यांना सुद्धा अतिक्रमण घरे म्हणून कारवाई केली जात आहे. पावसाळ्यात त्यांची घरे तोडली जाऊ नये. त्यावर ताबडतोब स्टे



आणला जावा, अशी मागणी केली. तीही त्यांनी मान्य केली. सोबतच ग्रामीण भागात गावठाणामध्ये ज्यांनी घरे बांधली आहेत. ग्रामपंचायत त्या घरांना अतिक्रमण ठरवतेय. त्यांना अतिक्रमण न ठरवता अधिकृत करण्याचा धोरणात्मक निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला.

३. नागपूर दीक्षाभूमी आंदोलन प्रकरणी कोणत्याही आंदोलकाला अटक केली जाणार नाही. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी नागपूर पोलीस आयुक्तांशी बोलून या प्रकरणात कोणालाही अटक केली जाणार नाही असा निर्णय घेतला.

# परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर : उद्योग मंत्री उदय सामंत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नागपूरः परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र पुन्हा देशात पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळविले आहे. राज्याच्या समतोल विकासासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आजवर नक्षलवादी जिल्हा म्हणून गडचिरोलीची ओळख आता आम्ही मिटवून उद्योग नगरीचा जिल्हा म्हणून नावारूपास आणत आहोत असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.दैनिक लोकमतच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण आज त्यांच्या हस्ते करण्यात आले. वनामती सभागृहामध्ये आयोजित या समारंभात इंडिया टुडेचे संपादक प्रभू चावला, दैनिक लोकमतच्या एडिटोरियल बोर्डचे चेअरमन विजय दर्डा, माजी मंत्री नितीन राऊत, दैनिक लोकमतचे संपादक श्रीमत माने व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.उद्योग क्षेत्रातील अनेक नामांकित उद्योजक शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देवून गडचिरोली जिल्ह्यात उद्योग उभारण्यासाठी पुढे सरसावत असल्याचे सामंत यांनी सांगितले. दैनिक लोकमतने पत्रकारितेसमवेत क्रिडा व सामाजिक क्षेत्रात अपूर्व योगदान दिले आहे. संपादकांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार




लोकमतच्या सामाजिक बांधिलकीचे व संपादकांप्रती कृतज्ञतेचे द्योतक ठरले आहे या शद्वात त्यांनी गौरव केला. यावेळी राज्यस्तरीय पत्रपंडित पद्मश्री पां. वा. गाडगीळ आणि पत्र महर्षी म.य. दळवी स्मृती पुरस्कारांचे वितरण उद्योगमंत्रीसामंत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# आर्टिलरी रेजिमेंट मधून सेवा निवृत्त प्रकाश घटकांबळे यांचा सत्कार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः माजी सैनिक आर्टिलरी रेजिमेंट मधून सेवा निवृत्त झालेले प्रकाश शरणाप्पा घटकांबळे मूळ राहणार हसापूर तालुका अक्कलकोट यांचे सत्कार समारंभ पार

पडला प्रतिकूल परिस्थितीतून सैन्यात जाऊन तेथून येऊन पुनर्नियुक्त जलसंपदा विभागात नोकरीस लागून सेवानिवृत्त झालेले त्यांचा संपतनिक सत्कार यश सिद्धी आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य आणि समता सैनिक दल तथा सिद्धना क ब्रिगेडतर्फे



सपत्नीक सत्कार करण्यात आला प्रमुख पाहुणे म्हणून आदरणीय केरू जाधव सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक समाज संघटक समता सैनिक दल सोलापूर शहर जिल्हा शाखा मुख्य पावणे म्हणून आदरणीय कॅप्टन कमलाकर कांबळे जिल्हा उपाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयानंद कांबळे साहेब यांनी केले व आभार प्रदर्शन माजी सैनिक शिवपुत्र घटकांबळे यांनी केले बहुसंख्येने महार रेजिमेंटचे माजी सैनिक तथा समता सैनिक दलाचे सदस्य उपस्थित होते

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतले श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन

## बारामती ते काटेवडी वारकऱ्यांसोबत पायी चालत वारीत सहभाग

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधी: उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी सपत्नीक बारामती येथे पालखी सोहळ्याला भेट देऊन जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले. त्यांनी बारामती ते काटेवडी वारकऱ्यांसोबत पायी चालत वारीत सहभाग घेतला. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या जयघोषात, टाळ मृदंगाच्या गजरात, हाती दिंड्या-पताका, मुखी विठ्ठल नाम अशा भक्तिमय वातावरणात आज सकाळी काटेवाडीकडे प्रस्थान झाले. यावेळी खासदार सुनेत्रा पवार, अपर पोलीस अधीक्षक संजय जाधव, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उपमुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव हनुमंत पाटील, महावितरणचे मुख्य अभियंता सुनील पावडे, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उप विभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी पुष्पहार अर्पण करून संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले. त्यांनी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसोबत संवाद साधला आणि टाळाच्या साथीने विठूनामाचा गजर केला.



पालखी मार्गावरील असलेल्या गावातील चौकात रांगोळी काढून, फुलांची उधळण करत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा आज इंदापूर तालुक्यातील सणसर येथे मुक्काम असणार आहे.